## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. १५ : खरा विकास तोच, जो समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचतो. शासनाच्या योजना, समाजकार्य आणि शिक्षण यांचे ध्येय 'अंत्योदय' या भावनेने प्रेरित असले पाहिजे असे प्रतिपादन प्रा. प्रकाश पाठक यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत पंडित दीनदयाळ उपाध्याय अध्यासनातर्फे "एकात्म मानव दर्शन – संकल्पना आणि प्रासंगिकता" या विषयावर एक दिवशीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि. १५ ऑक्टोबर रोजी विद्यापीठातील सामाजिक शास्त्र प्रशाळेच्या सभागृहात करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस टी इंगळे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. पवित्रा पाटील, अध्यासनाचे विभागप्रमुख पी. पी. माहुलीकर आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी बोलताना प्रा. पाठक म्हणाले की, व्यक्ती, कुटुंब, समाज मग राष्ट्र आणि निसर्ग असा विचार पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडला. त्यांनी मांडलेला एकात्म मानव दर्शन हे केवळ तत्वज्ञान नाही तर भारताच्या सामाजिक जीवनाचा आत्मा आहे. संस्कार, सर्वसमावेशक, वैचारिक, राष्ट्र निर्मितीसाठी, चारित्र्यसंपन्न, मूल्याधिष्ठित समाजनिर्मिती करणे हीच आपल्या खऱ्या प्रगतीची दिशा आहे. येत्या १५ ते २० वर्षात जगाला आपल्या या विचारधारेची गरज पडणार असल्याचे देखील ते यावेळी म्हणाले. समाजाचा आणि समाजातील सर्व लहान मोठ्या घटकांचा विकास झाला पाहिजे असे सांगत त्यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जीवनातील प्रेरणादायी घडामोडींची माहिती उपस्थितांना दिली.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी सांगितले की, मानव कल्याणाचा व्यापक दृष्टिकोन असलेला विचार म्हणजे एकात्म मानव दर्शन असे सांगत त्यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या विचारांवर प्रकाश टाकला.पंडितजींनी आपल्या चार भाषणातून एकात्म मानव दर्शनाचा विचार मांडला या विचारांची देशाला गरज आहे. त्यामुळे आज हा कार्यक्रम आयोजित केल्याचे त्यांनी सांगितले. तसेच पंडित दीन दयाल उपाध्याय यांच्या विचारांच्या एकात्म मानव दर्शन, एकात्म पालकत्व असे दोन क्रेडिट असेलेले कोर्स सुरू केले असून ते लवकरच उपलब्ध होणार आहेत. दीनदयाला उपाध्याय रोजगार मेळाव्याचे विद्यापीठात आयोजन करण्यात येत असून पंडितजी आणि त्यांच्यावर काम करणाऱ्या ई पत्रिका तयार करणार असल्याची माहिती देखील त्यांनी दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यासनाचे विभागप्रमुख प्रा. पी पी माहुलीकर यांनी केले. यात एकात्म मानव दर्शन हीरक महोत्सव साजरा करण्याचा उदेश सांगत त्यांच्या एकूण जीवन चरित्राचा आढावा घेतला. पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या शिक्षण, पत्रकारिता त्यांनी लिहिलेली पुस्तके माहिती देत विभागामार्फत आयोजित कार्यक्रमाचा आढावा घेतला.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात अंबाजोगाई येथील डॉ. वसंत देशमुख यांचे "आर्थिक विकासात वंचितांचा सहभाग – एकात्म मानव दर्शन आणि अंत्योदय", यवतमाळ येथील डॉ. नितीन खर्चे यांचे "एकात्म मानव दर्शन : पंच परिवर्तन"तर मुंबई येथील डॉ. रविकांत सांगुर्डे यांचे "एकात्म मानव दर्शन - उपयोगिता" या विषयांवर विशेष व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

अधिष्ठाता प्रा. जगदीश पाटील, अधिसभा सदस्य केदारनाथ कवडीवाले, स्वप्नाली काळे, वैशाली वऱ्हाडे, प्रा. अजय पाटील, डॉ. ऋषिकेश चित्तम, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक प्रा. जयेंद्र लेकुरवाळे, व्यवस्थापन प्रशाळेच्या संचालिका प्रा. मधुलिका सोनवणे यांच्यासह विद्यापीठातील विविध प्रशाळेतील शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वर्षा पालखे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. तुषार रायसिंग यांनी केले.

**बातमी नं. २**

जळगाव (प्रतिनिधी) दि. १५ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळा अंतर्गत बौद्ध अध्ययन व संशोधन केंद्रातर्फे आयोजित धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त बुद्ध धम्मातील हीनयान आणि महायानाचे तौलनिक विशेष या विषयावर दि. १४ ऑक्टोबर रोजी विद्यापीठातील दृकश्राव्य सभागृह येथे अमरावती येथील व्याख्याते प्रा. कमलाकर पायस यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा. म. सु. पगारे होते.

प्रा. कमलाकर पायस यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले की, बुद्ध हे कोण होते असा प्रतिप्रश्न करून व्याख्यानास सुरुवात करत हीनयान आणि महायान बुद्ध धर्मातील दोन प्रमुख पंथ असून दोघांचाही मुल आधार तथागत गौतम बुद्धांचे विचार व शिकवण आहे. यामध्ये बुद्ध हे महामानव असून त्यांनी साधनेने ज्ञान प्राप्ती केली असे त्यांनी नमूद केले. बुद्धांच्या काळात बुद्ध धम्म तत्कालीन साधनांच्या माध्यमातून संपूर्ण जगभर पसरला. बुद्धिझम म्हणजेच लोकशाही होय. त्यांनी हीनयान आणि महायान यांच्यातील फरक तसेच या दोन पंथांचे स्वरूप थोडक्यात सांगितले. तसेच बुद्धांचा धम्म हा वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारणारा कर्मकांडाला नकारणारा व समता, बंधुता तसेच बहुजन हिताय बहुजन सुखाय या सूत्राच्या आधारावर सर्व सामान्य माणसाचे कल्याण करणारा आहे.



## जनसंपर्क विभाग

अध्यक्षीय भाषणात प्रा. म. सु. पगारे यांनी सांगितले की, १४ ऑक्टोबर १९५६ रोजी पाच लाख अनुयायी सोबत बौद्ध धम्म स्वीकारला. बौद्ध धम्म स्वीकारण्याचे कारण की, या धम्मात जात, पात, वर्ण व्यवस्था नव्हती. तिथे विज्ञानवाद, बंधुता, समानता आहे. प्रज्ञा, शील, करुणा, पंचशील यांचे आचरण करणे हाच एकमेव शुद्ध मार्ग होय. विषमतेचा नाश म्हणजेच बौद्ध धम्म होय. दोन्ही पंथातील विविधतेनुसार त्यांच्या धार्मिक आचार विचारामध्ये मूर्तीपूजा, ग्रंथ, बौद्धिक साधना व तात्विक विचारामध्ये फरक आढळतो. बुद्ध धम्माचा अंतिम हेतू एकच असून दुःखातून मुक्ती म्हणजेच निब्बाण मिळवणे होय.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बौद्ध अध्ययन व संशोधन केंद्राचे विभागप्रमुख प्रा. संतोष खिराडे यांनी केले. सूत्रसंचालन श्री. गौरव हरताळे यांनी तर आभार प्रदर्शन जितेंद्र नाईक यांनी केले. या कार्यक्रमासाठी विद्यापीठातील भाषा व संशोधन केंद्रातील प्राध्यापक, विद्यापीठातील कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

**बातमी नं. ३**

जळगाव (प्रतिनिधी) दि. १५ : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यापीठ ज्ञानस्रोत केंद्रात केंद्रीय विद्यालयाचे विद्यार्थी, विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळांमध्ये प्रवेशित विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच इतर वाचक वर्गासाठी पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आलेले होते. भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न स्व. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्याच्या उद्देशाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन कुलसचिव डॉ. विनोद पाटील हस्ते संपन्न झाले.

या पुस्तक प्रदर्शनात साधारण ५०० विविध विषयांवरील पुस्तके प्रदर्शित करण्यात आलेली होती, त्यात विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, इतिहास, तत्वज्ञान, चरित्र, समाजशास्त्र, स्व-विकास, वाचन प्रेरणा, या विषयांवरील उत्कृष्ट पुस्तकांचा समावेश होता. तसेच गोष्टी व विविध खेळांशी संबंधीत पुस्तके आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी कथा संग्रह ठेवण्यात आलेले होते. केंद्रीय विद्यालयातील सुमारे १०० विद्यार्थ्यांनी पुस्तक प्रदर्शनास भेट दिली. विद्यापीठ ज्ञानस्रोत केंद्राचे प्रभारी संचालक विजय आहेर यांनी विद्यार्थ्यांना पुस्तकांची निवड तसेच वाचनाबद्दल मार्गदर्शन केले. पुस्तक प्रदर्शनाच्या यशस्वितेसाठी पुस्तकांची आकर्षक रचना करण्यासाठी विद्यापीठ ज्ञानस्रोत केंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १५ ऑक्टोबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव (प्रतिनिधी) दि. १५ :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातर्फे पेट २०२४ मधील मानवविज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन व आंतरविद्याशाखीय अभ्यासविद्या शाखेतील विद्यार्थ्यांसाठी प्री - पीएच.डी. कोर्सवर्कला कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी दि. १५ ऑक्टोबर रोजी मार्गदर्शन करतांना सांगितले की, समाजामध्ये सद्या असलेल्या सुविधांमध्ये अद्यावत बदल व समाजातील समस्यांवर उपाय काय करू शकतो असे विषय निवडून समाजापयोगी संशोधन करावे.

यावेळी मंचावर प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, अधिष्ठाता डॉ. अनिल डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी कुलगुरू पुढे म्हणाले की, संशोधन हे एकाग्रतेने, तीव्र आवडीने आणि आपल्या संशोधनाने उत्तम होईल असे करावे. आपले संशोधन इतरांना कसे उपयोगी पडेल यादृष्टीने संशोधन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १५ ऑक्टोबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता